D:/Regular-17/roshan new shelar/Circular

# University of Mumbai

**No. Aff./ICC/ (2018-19)/37/ of 2018**

## परिपत्रक:

विषय:- दिव्यांग विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये/ विद्यापीठांमध्ये सोईसुविधा उपलब्ध करून देणेबाबत

संदर्भ:- शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे क्र. उशिसं/दिविसो/२०१८/ वि.शि. १/९६४५ दिनांक २९-०८-२०१८ रोजीचे पत्र.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १०५/२०१८ मध्ये दिनांक १८ जूलै, २०१५ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे शासनाने दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, सदरच्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या निर्देशानुसार आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात शैक्षणिक आस्थापनांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना सोईसुविधा पुरविण्यात याव्यात. वरील परिपत्रकातील निर्देशानुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा. (प्रत सोबत जोडत आहोत)

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक

26-9-18

(प्रो. सुनिल भिरूड)
कुलसचिव (प्र)

मुंबई-४०० ०३२
24 सप्टेंबर, २०१८

...shan new shelar/Circular
...sity of Mumbai

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय **(उच्चशिक्षण)**
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य,पुणे-१

क्र.उशिसं/दिविसो/२०१८/वि.शि.१/ 9645 दिनांक. 29 AUG 2018

प्रति,

१) सहसंचालक,
उच्चशिक्षण, सर्व विभाग.

२) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICO/ECO/2017
10 SEP 2018
17268

p. AR

**विषय-दिव्यांग विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये/विद्यापीठांमध्ये सोईसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

संदर्भ-१-शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/ विशि-३/दिनांक. २७ ऑगस्ट,२०१८

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१०५/२०१८ मध्ये दिनांक.१८ जुलै,२०१८ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे शासनाने दिनांक.२७ ऑगस्ट,२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

तरी सदरच्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या निर्देशानुसार आपल्या विभागातील शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ सर्व अकृषी विद्यापीठे तसेच शासकीय शैक्षणिक आस्थापनांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना सोईसुविधा पुरविण्यात याव्यात, तसेच सदरच्या सोईसुविधा उपलब्ध केल्याबाबतचा कार्यपालन अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा.
सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्चशिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.१

प्रत-मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांना माहितीसत्व सादर

DR (Affiliation)

Supt. Issue circular

12/09

R.C. for n.a.

14/09

11-9-18

Registrar